CAD to be at sustainable levels: Das

Cautions start-ups on risk build-up

ABHIJIT LELE
Mumbai, 9 June

"THE GOVERNMENT HAS ANNOUNCED IT WILL COME OUT WITH A DISCUSSION PAPER. THE RBI HAS CONVEYED ITS VIEWS TO THE GOVERNMENT. THE RBI IS VERY CLEAR ABOUT THE HUGE RISKS TO FINANCIAL STABILITY"
SHAKTIKANTA DAS, RBI governor

Reserve Bank of India (RBI) Governor Shaktikanta Das on Thursday said the current account deficit (CAD) will be sustainable and may be financed by normal capital inflows.

India's CAD widened to $23 billion in the third quarter (Q3) of 2021-22 (FY22). This was 2.7 per cent of the country's gross domestic product (GDP) due to higher trade deficit. CAD was $9.9 billion (1.3 per cent of GDP) in the second quarter of FY22 and $2.2 billion (0.3 per cent of GDP) a year ago (Q3 of 2020-21).

Das in his statement on the June monetary policy review had said optimism about exports — of both goods and services and remittances — should help contain CAD at sustainable levels, financed by normal capital flows. As on June 3, India's foreign exchange reserves were of the order of $601.1 billion, supplemented by healthy levels of net forward assets of the RBI.

With global crude oil prices surging above $100 per barrel — first time since 2014 — there are concerns over CAD widening beyond sustainable levels.

According to rating agency ICRA, CAD is expected to reach $95-100 billion (2.7 per cent of GDP) in 2022-23, from the estimated $41.5-43.5 billion in FY22 (1.3 per cent of GDP).

Speaking at an event organised by the Central Board of Indirect Taxes and Customs, Das reiterated the central bank's views on cryptocurrency, saying there are risks to financial stability.

"As far as the government is concerned, I cannot reply. The government has announced it will come out with a discussion paper. The RBI has conveyed its views to the government. The RBI is very clear about the huge risks to financial stability," he said, while answering a question on the RBI vision of the use of cryptocurrency by the government for paying taxes, along with procurement.

As for new opportunities and challenges in businesses and start-ups, the RBI governor said "they should constantly evaluate the build-up of risks and vulnerabilities in their businesses". Many of them may be doing it already and risk-taking is a part of their business model. These should always be kept in the back of one's mind for long-term sustainability of any business, said Das.

Businesses are going through a redefining phase and adapting to the new realities emerging from the pandemic. The adoption of digital technologies and artificial intelligence is getting accelerated. These disruptive technologies offer opportunities to young enterprises to carve out a niche in a market dominated by incumbents.

₹ slips to fresh low of 77.77/$

MANOJIT SAHA
Mumbai, 9 June

FREE FALL
Rupee spot
(Inverted scale)



The rupee closed at a fresh low for a second consecutive day after it settled at 77.77 per dollar before going to 77.81 per dollar in intraday deals as risk-averse investors continue to pull out from emerging markets amid surging crude oil prices.

After flat opening, the Indian currency hit day's low of 77.81/$ as compared to the previous close of 77.74/$.

"Sword is still hanging on the rupee amid persistent FII's selling from EM's leading to Asian currencies weakening, elevated oil prices, and revised upward inflationary pressure for coming quarters," said Amit Pabari, managing director, CR Forex.

The Indian currency came under pressure after the US Federal Reserve started to tighten monetary policy to tackle high inflation. All major global currencies are facing inflationary pressure due to supply side issues and surge in oil prices following the Russian invasion of Ukraine in late February.

The rupee depreciated over 2.5 per cent in the current fiscal year. The central bank has been intervening aggressively which slowed the pace of rupee's depreciation.

"The only ray of hope for rupee presently will remain RBI who has actively and aggressively participated to protect rupee from the heat so far," Pabari said.

Analysts expect there could be pressure on rupee as the current account deficit is likely to widen after global crude oil price went past above $100/bbl — first time after 2014.

India's current account deficit (CAD) widened to $23 billion in the third quarter ended December 2021 (Q3FY22), which was 2.7 per cent of the country's gross domestic product (GDP) due to higher trade deficit.

While announcing the monetary policy review on Wednesday, RBI Governor Shaktikanta Das said exports of both goods and services and remittances should help contain the current account deficit (CAD) at a sustainable level, which can be financed by normal capital flows.

CAD may hit 3-yr high of $43.8 billion in FY22

The current account deficit (CAD) is likely to hit a three-year high of 1.8 per cent or $43.81 billion in FY22, as against a surplus of 0.9 per cent or $23.91 billion in FY21, a report by by India Ratings said on Thursday.

According to an assessment, the CAD has moderated to $17.3 billion or 1.96 per cent of GDP in the fourth quarter of FY22 as against $8.2 billion or 1.03 per cent in the year-ago period, and massively down from $23.02 billion or 2.74 per cent in Q3, which was a 13-quarter high. The improvement is due to the remarkable improvement in merchandise exports in FY22 when it grew 42.4 per cent against a negative 7.5 per cent in Covid-hit FY121. PTI

'Will list subsidiaries at opportune time'

State Bank of India (SBI), which saw healthy loan demand from the corporate sector in the fourth quarter (Q4) of 2021-22 (FY22), expects loan growth to improve in the current fiscal year (2022-23, or FY23). **DINESH KUMAR KHARA**, chairman, SBI, in an interview to **Manojit Saha** details the bank's plans to navigate a rising interest-rate environment. Edited excerpts:

Q&A
DINESH KUMAR KHARA
Chairman, SBI

SBI's loan growth for FY22 was higher than the system growth. Q4 also saw good demand for corporate loans. Two months into FY23, do you see the trend on corporate loan demand continuing?
Certainly. It was mainly due to better utilisation of working capital limits by large corporates and availing of term loan facilities.

We have a healthy conduit of proposals for corporate loans under review. These augur well for corporate credit growth. As and when we see capacity utilisation levels improve beyond a threshold, it will need better utilisation of working capital.

Our retail engine continues to do well. We will have corporate support.

WE HAVE A HEALTHY CONDUIT OF PROPOSALS FOR CORPORATE LOANS UNDER REVIEW

ALMOST 75% OF OUR LOANS ARE LINKED TO THE MARGINAL COST OF FUNDS-BASED LENDING RATE, EXTERNAL BENCHMARK-BASED LENDING RATE OR REPO. WE ARE BETTER PLACED IN TERMS OF MARGINS

IN A RISING INTEREST-RATE SCENARIO, IT IS BENEFICIAL FOR THE BORROWER TO CREATE ASSETS BY INCREASING LEVERAGE

Do you expect better credit growth in FY23?
We expect credit growth to be at the same levels, if not better.

Do you think the retail credit growth momentum will sustain, interest rate hikes notwithstanding?
We have seen positive trends in terms of retail loan growth. When it comes to retail loans, the borrower will also look at the equated monthly instalment to net annual income ratio. During inflationary times, salaries increase as well. If loans are contracted at a particular rate of interest, it makes sense for borrowers to create an asset by increasing leverage. Asset prices keep increasing during inflationary conditions, whereas repayment obligation remains constant or increases marginally. To that extent, it is beneficial to the borrower to create assets by increasing leverage.

Coming to asset quality, there are reports of layoffs and attrition in technology-related sectors. Many working in these sectors availed of loans via the Yono application. What kind of asset quality pressure do you see from the salaried class?
These loans were given to corporate salary package customers — a very significant part comprises government and public sector employees, and defence personnel. The kind of stress you indicated we did not witness. When we look at the quality of our retail loan book, the non-performing asset percentage is low. We do not envisage any challenge to our retail loan book.

The second is the small and medium-sized enterprises (SME) sector. SBI's loan growth in this sector was around 25 per cent compound annual growth rate in the past three years. Several factors have impacted its volumes. What kind of stress do you see from the SME sector?
Our experience does not suggest that. We have been very careful in terms of ensuring credit quality of the bank remains superior. We have indicated that if we visualise any indication of stress, we'd rather provide for such stress before we are mandated in terms of regulatory prescription. That is why our provision coverage ratio is over 90 per cent. We have built in enough cushion on the balance sheet.

THE BUSINESS STANDARD BANKING SHOW
SCAN THE CODE TO WATCH THE INTERVIEW

SBI's capital adequacy ratio (CAR) at the end of Q4FY22 was 13.83 per cent. Do you see the need to raise equity capital in FY23, given the kind of growth the bank will have?
We will take a call. Given the kind of growth we are visualising, we are well-equipped to support that kind of growth with the current CAR. If required, we can raise tier I, II bonds, depending on how the situation plays out. We have not gone to the board for any kind of proposal for a capital-raise.

Are you looking to list some of your subsidiaries — SBI Mutual Fund or SBI General Insurance — in FY23?
We have nurtured these subsidiaries over a period of time. We will take them to the markets at an opportune time. We will scout for capital for those pockets, but I don't want to compromise when it comes to listing such entities at a time when they may not fetch the right price.

Do you think net interest margins can improve further in a rising interest-rate scenario?
Almost 75 per cent of our loans are linked to the marginal cost of funds-based lending rate, external benchmark-based lending rate or repo. That way a rising interest-rate scenario turns out to be beneficial to banks that have a floating rate of interest, compared to a fixed one. We are well placed in that context.

With bond yields rising, how do you see the treasury performing? Is there any discussion with the regulator for some dispensation like amortising losses over a few quarters?
No, there is no such discussion. The Reserve Bank of India has given permission for putting 23 per cent of net demand and time liabilities into the held-to-maturity category. In a rising interest-rate scenario when yields are increasing, that gives more muscle to the banking system to earn better yields and also withstand mark-to-market losses which might be there in the available-for-sale (AFS) book.

If we witness decent credit growth, we will be in a position to shrink our AFS book.

Last year, we had provided for security receipts of nearly ₹3,600 crore. This year, we do not have any such obligation.

CIL floats maiden import tender for 2.4 mt of coal

SHREYA JAI
New Delhi, 9 June

STATE GENCOS



Source: CIL import coal tender

PRIVATE FIRMS



For the first time ever, Coal India (CIL) has issued a tender for purchasing imported coal for power generating companies (gencos) in the wake of the Centre directing it to meet the shortfall in the domestic coal supply chain.

CIL has called for bids to supply 2.4 million tonnes (mt) of coal to be delivered for the July to September 2022 period. The estimated value of the contract is ₹3,100 crore, CIL said in the tender document.

The imported coal would be supplied to state government-owned gencos and independent power producers (IPPs), 1.2 mt each. The IPPs include Sembcorp Energy, JP Power, Avantha Power, Lanco, Rattan India, GMR, CESC, Vedanta Power, Jindal India Thermal, among others. The states that will receive imported coal for their generating stations are Punjab, Gujarat, West Bengal, Tamil Nadu, Jharkhand, and Madhya Pradesh.

Last month, the power ministry directed CIL to import coal for state and private gencos. This came two weeks after state and private gencos were told to import coal for 10 per cent blending, but were later asked to keep their tenders 'in abeyance'. Several states expressed reluctance to import coal and asked for CIL to arrange the dry fuel from global markets.

But as against the estimated demand of 38-40 mt from state and private gencos for blending, the total demand received by the CIL is 2.4 mt. CIL executives said for the upcoming season, only this quantity would be imported, as this is the final and only demand that has come to it.

In a statement, CIL said, after the price discovery, it would immediately execute a contract with the successful bidder for supply of coal. "Then the state-owned coal miner shall enter into a back to back agreement with state gencos and IPPs to whom coal has to be supplied," it said.

Central government-owned NTPC is in the process of issuing tenders for 20 mt to meet its imported coal blending target. Business Standard recently reported that NTPC has awarded 6.25 mt of imported coal tender worth ₹8,300 crore to Adani Enterprises.

Due to the high cost of imported coal, power tariff from NTPC units is scheduled to go up by at least 50-70 paise. This will have to be borne by consumers. As far as state and private gencos are concerned, they will need regulatory approval for transferring the additional cost of imported coal on to consumers. Invoking Section 11 of the Act again, the power ministry last week allowed state and private units to charge a compensation tariff in lieu of importing coal.

The coal ministry, on the other hand, has questioned the concerns over coal shortage in the coming months saying there is enough domestic stock available and it is up to power generators to stock up before the monsoon months. Senior coal ministry officials said there is a stock of 20 mt with power plants which is enough for nine days of operations.

सेन्सेक्स : ५५,३२०.२८ ▲ ४२७.७९ (+०.७८%) | निफ्टी : १६,४७८.१० ▲ १२१.८५ (+०.७४%) | डॉलर/₹ : ७७.७६ ▲ ०८ पैसे | तेल / $: १२३.४२ ▼ ०.९३%

रुपयाचा ऐतिहासिक तळ

चार सत्रातील घसरणीतून सावरत ‘सेन्सेक्स’ची ४२५ अंश उसळी

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : जागतिक पातळीवर खनिज तेलाच्या वाढत्या किमती आणि परकीय गुंतवणुकीचे निर्गमन या परिणामी गुरुवारच्या सत्रात रुपया डॉलरच्या तुलनेत आणखी ८ पैशांनी घसरत ७७.७६ रुपये पातळीवर गडगडून स्थिरावला. त्यानंतर ७७.८१ हा ऐतिहासिक नीचांकी तळही त्याने दाखविला. बुधवारच्या सत्रात रुपया ७७.६८ पातळीवर स्थिरावला होता. मात्र गुरुवारी सेन्सेक्स चार सत्रातील घसरणीतून सावरताना दिसला.

आंतरबँक परकीय चलन बाजारात गुरुवारच्या सत्रात रुपयाने ७७.७४ या नीचांकापासूनच व्यवहारास सुरुवात केली. परदेशी गुंतवणूकदारांकडून समभाग विक्रीचा मारा सुरूच असल्याने आशियातील प्रमुख भांडवली बाजारात निर्देशांकांची घसरण कायम आहे. त्या परिणामी सर्वच आशियाई चलने अमेरिकी डॉलरच्या तुलनेत कमजोर झाली आहेत. बुधवारी रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरात अर्ध्या टक्क्यांची वाढ करण्यात आली. सलग दोन महिन्यांच्या काळात रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ०.९० टक्क्यांची वाढ केली. बरोबरीने चलनातील घसरणीला रोखण्यासाठीही मध्यवर्ती बँकेचा सक्रियपणे हस्तक्षेप वाढेल, हाच सध्यातरी रुपयासाठी आशेचा एकमेव किरण आहे, अशी प्रतिक्रिया सीआर फॉरेक्स ॲडव्हायझर्सचे व्यवस्थापकीय संचालक अमित पाबारी यांनी व्यक्त केली.

युक्रेन युद्ध सुरूच असल्याने त्याच्यासह उच्च चलनवाढीने एकूण जागतिक अर्थव्यवस्थेपुढे मंदीचे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे सुरक्षित आश्रय आणि चिरंतन पर्याय म्हणून डॉलर मालमत्तांकडे जागतिक गुंतवणूकदारांचा ओढा वाढला आहे. अन्य सर्व जागतिक चलनांच्या तुलनेत अमेरिकी डॉलरची मजबुती ही रुपयाच्या मूल्यालाही मारक ठरली आहे.

‘सेन्सेक्स’ची झेप

मुंबई : जागतिक पातळीवरील प्रतिकूल संकेताकडे दुर्लक्ष करत, रिलायन्स इंडस्ट्रीज, भारती एअरटेल आणि टेक महिंद्र या आघाडीच्या समभागात गुंतवणूकदारांनी खरेदीचा सपाटा लावल्याने गुरुवारी भांडवली बाजारात ‘सेन्सेक्स’ला ४२७ अंशांच्या उसळीचे बळ मिळवून दिले.

दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ४२७.७९ अंशांनी वधारून ५५,३२०.२८ पातळीवर बंद झाला. गुरुवारच्या सत्रात सेन्सेक्सने ५५,३६६.८४ अंशांच्या उच्चांकी पातळीला स्पर्श केला, तर सत्रादरम्यान त्याचा नीचांक ५४,५०७.४१ अंश असा होता. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्ये १२१.८५ अंशांची वाढ झाली आणि तो १६,४७८.१० पातळीवर स्थिरावला.

पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि वाढती महागाई यामुळे अमेरिकी फेडरल रिझर्व्हच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. देशांतर्गत अर्थव्यवस्थेतही एकीकडे करसंकलन वाढत असले तरी, सरकारचा अनुदानावरील खर्च वाढल्याने भांडवली खर्चात कपात होण्याची शक्यता आहे. तथापि या अनिश्चिततांकडे दुर्लक्ष करीत गेल्या काही महिन्यांपासून देशांतर्गत गुंतवणूकदारांमध्ये खरेदीचा उत्साह कायम आहे. तर परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून अव्याहतपणे समभाग विक्रीचा मारा कायम आहे, असे निरीक्षण एलकेपी सिक्युरिटीजचे संशोधनप्रमुख एस रंगनाथन म्हणाले.

सेन्सेक्समध्ये डॉ. रेड्डीज, रिलायन्स इंडस्ट्रीज, भारती एअरटेल, टेक महिंद्र, सन फार्मा आणि कोटक महिंद्र बँक यांचे समभाग सर्वाधिक तेजीत होते. दुसरीकडे टाटा स्टील, एनटीपीसी, स्टेट बँक आणि बजाज फायनान्सच्या समभागात प्रत्येकी ३.८१ टक्क्यांपर्यंत घसरण झाली.

‘एचडीएफसी’चे गृहकर्ज महागले

मुंबई : देशातील सर्वात मोठी गृह वित्त कंपनी ‘एचडीएफसी लिमिटेड’ने गुरुवारी तिच्या प्रधान ऋण दरात ५० आधार बिंदू (अर्धा टक्के) वाढ करीत असल्याची घोषणा केली, ज्याच्या परिणामी कंपनीच्या विद्यमान कर्जदारांना वाढीव हप्त्याचा (ईएमआय) ताण सोसावा लागणार आहे. ही व्याजदर वाढ १० जून २०२२ पासून लागू झाली आहे. ‘एचडीएफसी’ने एका महिन्यात सलग चौथ्यांदा गृहकर्जाचे दर वाढवले आहेत. बँकेने १ जून रोजी व्याजदरात पाच आधार बिंदूची वाढ केली होती. तर त्याआधी ९ मे आणि २ मे रोजी बँकेने व्याजदरात अनुक्रमे ०.३० टक्के ०.०५ टक्क्यांची वाढ केली होती.

कोटक बँकेकडून ठेवदरात वाढ

मुंबई : खासगी क्षेत्रातील कोटक महिंद्र बँकेने बचत खाते आणि ठेवींवरील व्याजदरात गुरुवारी वाढ करीत असल्याची घोषणा केली आहे. नवीन व्याजदर वाढ येत्या १३ जूनपासून लागू होणार आहे. बचत खात्यातील ५० लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम असणाऱ्या खात्यांना आता अर्धा टक्का अधिक म्हणजे ४ टक्के दराने व्याज दिले जाणार आहे. तर मुदत ठेवींवरील व्याजदरात १० ते २५ आधार बिंदूंची वाढ बँकेने केली आहे.

‘इक्विटी फंडां’ना पसंती

मे महिन्यात १८,५०० कोटींच्या गुंतवणुकीची भर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : युक्रेन-रशिया युद्ध आणि त्या परिणामी महागाईचा आगडोंब आणि शेअर बाजारातील अस्थिरता असताना, समभागसंलग्न अर्थात इक्विटी म्युच्युअल फंडांनी सलग १५व्या महिन्यात गुंतवणूकदारांमध्ये पसंतीक्रम कायम राखून, सरलेल्या मे महिन्यांत १८,५२९ कोटी रुपयांची निव्वळ भर नोंदविली. एप्रिलमधील १५,८९० कोटी रुपयांच्या नक्त प्रवाहाच्या तुलनेतील या लक्षणीय वाढीत शिस्तबद्ध गुंतवणुकीच्या ‘एसआयपी’ सुविधेच्या वापरावरील गुंतवणूकदारांच्या वाढत्या विश्वासाचेही योगदान राहिले, असे असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड इन इंडियाने (ॲम्फी) गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीतून दिसून आले.

मार्च २०२१ पासून म्हणजे सलग १५ महिने इक्विटी योजनांमध्ये नक्त ओघ आधीच्या महिन्याच्या तुलनेत वाढत आला आहे, ज्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये समभाग गुंतवणुकीविषयी सकारात्मक भावना दिसून येत आहे. याआधी, जुलै २०२० ते फेब्रुवारी २०२१ या आठ महिन्यांत समभागसंलग्न योजनांमधून निरंतर निर्गुंतवणुकीतून, एकूण ४६,७९१ कोटी रुपयांची गळती दिसून आली होती.

सर्व समभागसंलग्न योजनांतील सर्व श्रेणींमध्ये मे महिन्यातील प्रवाह सकारात्मक राहिला असून फ्लेक्सी-कॅप फंड श्रेणी ही २,९३९ कोटी रुपयांच्या निव्वळ ओघासह सर्वात मोठी लाभार्थी ठरली. याशिवाय, लार्ज-कॅप, लार्ज व मिड-कॅप फंड आणि सेक्टोरल/ थीमॅटिक फंडांनी प्रत्येकी २,२०० कोटी रुपयांहून अधिक नक्त गुंतवणूक मिळविली.

‘एसआयपी’मधील सातत्यपूर्ण प्रवाह हा समभागसंलग्न योजनांतील नक्त सकारात्मक गुंतवणुकीच्या पथ्यावर पडला आहे. सध्याच्या अस्थिर परिस्थितीतही त्यात फरक पडलेला नसून, समभागसंलग्न योजनांबाबत किरकोळ गुंतवणूकदारांमधील स्वारस्य कायम असल्याचे दिसून येते. नवीन गुंतवणुकीचा प्रवाह सर्व श्रेणींमध्ये सारखाच विभागलेला व चांगलाच वैविध्यपूर्ण आहे, हेही विशेषच, अशी प्रतिक्रिया मोतीलाल ओसवाल एएमसीचे मुख्य व्यवसाय अधिकारी अखिल चतुर्वेदी यांनी आकडेवारी बोलताना दिली. मूल्यांकन चढे असूनही भारताचा भांडवली बाजार सर्व उभरत्या बाजारपेठांच्या तुलनेत गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक पर्याय आहे, हेच यातून अधोरेखित होते असे मॉर्निंगस्टार इंडियाच्या वरिष्ठ विश्लेषक कविता कृष्णन यांनी सांगितले.

समभागसंलग्न योजनांव्यतिरिक्त, गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंड (ईटीएफ) श्रेणीमध्ये २०३ कोटी रुपयांचा ओघ दिसून आला. दुसरीकडे, मे महिन्यात रोखेसंलग्न (डेट) योजनांतून ३२,७२२ कोटी रुपये गुंतवणूकदारांनी काढून घेतले, त्या आधीच्या एप्रिल महिन्यात या योजनांमध्ये ६९,८८३ कोटी रुपयांचा निव्वळ भर पडली होती.

एकूणच, म्युच्युअल फंड उद्योगाने एप्रिलमधील ७२,८४६ कोटी रुपयांच्या नक्त वाढीच्या तुलनेत सरलेल्या मे महिन्यात ७,५३२ कोटी रुपयांची नक्त गळती अनुभवली.

परिणामी म्युच्युअल फंड उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता (एयूएम) हे एप्रिलअखेरच्या ३८.८९ लाख कोटी रुपयांच्या पातळीवरून मे अखेरीस ३७.३७ लाख कोटी रुपये अशी किंचित घटली आहे.

‘एसआयपी’द्वारे मासिक ओघ १२,२८६ कोटी

शिस्तबद्ध गुंतवणुकीच्या ‘एसआयपी’ (सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) पद्धतीद्वारे म्युच्युअल फंडांतील ओघ उत्तरोत्तर वाढतच असून, एप्रिलमधील ११,८६३ कोटी रुपयांच्या पातळीवरून तो वाढून मे महिन्यात १२,२८६ कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर गेला आहे. ‘एसआयपी’ ओघ मासिक १०,००० कोटींपेक्षा जास्त राहण्याचा हा सलग नववा महिना आहे. सप्टेंबर २०२१ मध्ये सर्वप्रथम १० हजारांपुढे म्हणजेच, १०,३५१ कोटी रुपये ‘एसआयपी’मार्फत गुंतविले गेले होते.

> **किरकोळ गुंतवणूकदारांची दीर्घकालीन बचतीसाठी ‘एसआयपी’सारख्या शिस्तबद्ध पद्धतीने समभागसंलग्न (इक्विटी) आणि हायब्रीड मालमत्ता पर्यायांना पसंती कायम दिसून येते. त्याच वेळी व्याजदर वाढीच्या परिस्थितीत लिक्विड आणि ओव्हरनाइट फंडांसारख्या निश्चित उत्पन्न मालमत्ता योजनांकडे त्यांचा ओढा वाढत असल्याचे दिसत आहे.**
> **– एन एस व्यंकटेश,** मुख्य कार्यकारी, ॲम्फी

डिजिटल कर्जदात्या मंचांसाठी लवकरच कायदेशीर चौकट – रिझर्व्ह बँक

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : रिझर्व्ह बँक लवकरच डिजिटल कर्ज म्हणजेच विविध ‘ॲप’च्या माध्यमातून कर्ज देणाऱ्या मंचांसाठी कायदेशीर चौकट तयार करेल, ज्यामुळे अनेक अनधिकृत आणि फसवणुकीच्या प्रकारांना चाप बसेल, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी गुरुवारी येथे स्पष्ट केले.

सध्या डिजिटल कर्ज व्यासपीठांच्या (ॲप) माध्यमातून सर्वसामान्यांना आणि छोट्या व्यावसायिकांना भरीस पाडून झटपट आणि विनासायास कर्ज वितरित करण्याची आमिष दाखवण्यात येते. मात्र त्यांनतर कर्जावर अवाजवी दराने आकारल्या जाणाऱ्या व्याजामुळे आणि ते वसुलीसाठी करण्यात जाचाच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही कर्जदारांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊलही उचलल्याचे दिसले आहेत. तथापि लवकरच व्यापक कायदेशीर चौकट तयार केली जात असून ज्यामुळे या डिजिटल व्यासपीठांच्या माध्यमातून अनधिकृत आणि बेकायदेशीररीत्या कर्ज वितरणाला लगाम बसेल. सध्या बरेच कर्ज वितरण करणारे व्यासपीठ नोंदणीकृत नसल्याचेही दास यांनी सांगितले. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाने आयोजित केलेल्या ‘आझादी का अमृत महोत्सव’ उपक्रमाचा भाग असलेल्या ‘आयकॉनिक वीक’ सोहळ्यात ते बोलत होते. नोंदणीकृत नसलेल्या कर्ज व्यासपीठांकडून कर्जदारांना त्रास दिला जात असल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा. जेणेकरून स्थानिक पोलीस त्या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून त्यावर कारवाई करतील.

कुठे तक्रार कराल?

भामट्या डिजिटल कर्जदात्या मंचांकडून अनधिकृत ‘मोबाइल ॲप’द्वारे ग्राहकांना कर्ज दिले जाते आणि कर्जदारांवर वाजवीपेक्षा जास्त व्याजाचा दर आणि अनेक छुप्या शुल्कांची वसुलीदेखील त्यांच्याकडून केली जाते. तसेच कर्जवसुलीसाठीही अप्रशस्त आणि दांडगाईच्या मार्गाचा वापर केला जातो. अशा फसगत झालेल्या लोकांना ऑनलाइन तक्रार दाखल करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने संकेतस्थळावर (rbi.org.in/Scripts/Complaints.aspx) अशी विशेष खिडकीही खुली केली आहे.

खासगीकरण धोरणाविरोधात संघटित लढ्याची हाक

बँक ऑफ इंडिया अधिकाऱ्यांची वार्षिक सभा

मुंबई : केंद्र सरकारने हाती घेतलेल्या बँकांच्या खासगीकरण धोरणाविरोधात संघटित होण्याची गरज प्रतिपादतानाच, काम आणि जीवनाचे संतुलन साधत शिस्तबद्ध बँकिंग कारकीर्दीचे महत्त्व ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशनचे सरचिटणीस सौम्य दत्ता यांनी रविवारी येथे अधोरेखित केले.

दादरमधील बी. एन. वैद्य सभागृहात पार पडलेल्या बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांची संघटना ‘फेडरेशन ऑफ बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन (एफबीओआयओए)’च्या मुंबई आणि गोवा शाखेच्या ५०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. एफबीओआयओएचे सरचिटणीस सुनील कुमार यांनीही खासगीकरणाविरोधात कर्मचारी-अधिकारी एकजुटीने उभे राहातील असे याप्रसंगी आवाहन केले.

अधिकारी महासंघाचे बँकेच्या व्यवस्थापनाशी असलेल्या सौहार्दपूर्ण संबंधांचा कौतुकाने उल्लेख करीत बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक स्वरूप दास गुप्ता यांनी चालू आर्थिक वर्षात ग्राहकांना उत्तम सेवा देऊन व्यावसायिक प्रगतीसाठी सर्वांचा हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला. बँकेचे दुसरे कार्यकारी संचालक कार्तिकेयन आणि मोनिका कालिया यांनीही सभेला उपस्थिती राहून शुभेच्छा दिल्या. सभेत २०२२ ते २०२५ या तीन वर्षे कालावधीसाठी निवडून आलेल्या महासंघाच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची घोषणा करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

औषधांच्या पॅकेजिंगची बाजारपेठ तीन अब्ज डॉलरचा टप्पा गाठणार!

मुंबई : संपूर्ण जगाचे औषधनिर्माण केंद्र म्हणून भारताने साधलेल्या प्रगतीमध्ये औषधांच्या नावीन्यपूर्ण आणि सुस्थित पॅकेजिंगचे मोठे योगदान राहिले आहे. म्हणूनच २०३० औषधी उद्योगाची सध्याच्या ४२ अब्ज डॉलर ते १३० अब्ज डॉलरपर्यंत प्रगतीत, संलग्न पॅकेजिंग उद्योगही सध्याच्या १.४ अब्ज डॉलरवरून तीन अब्ज डॉलर अशा दराने प्रगती साधू शकेल, असा विश्वास ‘इनोपॅक फार्मा कॉन्फेक्स’च्या गुरुवारी झालेल्या उद्घाटनसत्रात व्यक्त करण्यात आला. फार्मा पॅकेजिंग क्षेत्रात कार्यरत ५० बड्या कंपन्या त्यांची उत्पादने आणि यंत्रसामग्रीसह सहभागी झालेल्या ११ वे वार्षिक इनोपॅक प्रदर्शन व परिषद यंदा ९ ते १० जूनदरम्यान हॉटेल सहारा स्टार येथे योजण्यात आली आहे. परिषदेचे आयोजक इन्फॉर्मा मार्केट्सचे व्यवस्थापकीय संचालक योगेश मुद्रास यांनी स्पष्ट केले की, फार्मा पॅकेजिंग उद्योगाला भारतात वार्षिक सरासरी ८ टक्क्यांहून अधिक दराने वाढीसह तीन अब्ज डॉलरपर्यंत मजल मारता येऊ शकेल.